# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

**मान्यताप्राप्त युनियन**

*कामगार बंधू आणि भगिनींनो,*

आपणास कळविण्यास येत आहे कि, दि. 19 जून 2017 रोजी कर्मचारी संघटनेने MOU-2004 संदर्भात सविस्तर पत्र मा. चेअरमन तसेच मा. डायरेक्टर एच आर आणि डायरेक्टर ऑफशोअर यांना लिहून आजपर्यंत MOU संदर्भात कर्मचारी संघटना व मॅनेजमेंट यांच्यामध्ये झालेली चर्चा कळविली होती. परंतू या MOU संदर्भात कमिटीमध्ये कोणताच ठोस निर्णय होत नसल्यामुळे संबधित कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष खदखदत होता व त्यामुळे ओएनजीसीतील कर्मचारी व व्यवस्थापनामधील सलोख्याचे संबंध बिघडून औद्योगीक शांतताही भंग होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. मा. चेअरमन साहेबांस कामगारांवरील या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व या सर्व गोष्टींचा निषेध करण्यासाठी कर्मचारी संघटना रस्त्यावर उतरुन निदर्शने करणार असल्याचे पत्र कर्मचारी संघटनेने दिले.

आपल्या पत्राची वरीष्ठ मॅनेजमेंटने गंभीरतेने दखल घेवून दि. 27 जून 2017 रोजी चिफ ईआर मा. श्री. आलोक मिश्रा साहेब यांना या विषयावर चर्चा करण्यासाठी मुंबईला धाडण्यात आले. दि. 27 जून 2017 रोजी सायंकाळी चिफ ईआर साहेबांनी कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस श्री. प्रदीप मयेकर यांच्याशी संपर्क साधून चर्चा करण्यासाठी वेळ ठरविली व दुसऱ्या दिवशी सरचिटणीस श्री. प्रदीप मयेकर, अध्यक्ष श्री. प्रकाश दळवी व अन्य पदाधिकारी यांच्या समवेत दुपारी 3.00 वाजता ग्रीन हाईट्स येथे बैठक संपन्न झाली. या सभेत मा. श्री. प्रदीप मयेकर यांनी चिफ (ईआर) यांच्यासमोर स्पष्टपणे खुलासा केला कि या 2004 च्या MOU मुळे संबंधीत कामगारांचे नुकसान झालेले असून त्यासंबंधी युनियनने अनेकदा पत्रव्यवहार केलेला आहे. कर्मचारी संघटनेची मागणी मॅनेजमेंटला योग्य वाटल्यामुळे 3 वर्षापूर्वी या MOU त सुधारणा करण्याकरीता मॅनेजमेंटने MOU 2004 Review Committee गठीत केली होती. आज या कमिटीला 3 वर्षांपेक्षा अधिक काळ झालेला असून सात मिटींगनंतर देखिल अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. सुरुवातीपासून आजपर्यंत कर्मचारी संघटना या विषयात अत्यंत तळमळीने व प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असताना देखिल केवळ मॅनेजमेंटकडून काहीच निर्णय येत नसल्यामुळे आज कर्मचारी संघटनेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उठू लागले आहे. त्यामुळे या समस्येचा सोक्षमोक्ष लावण्या करीता कर्मचारी संघटनेला रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याचा निर्णय घ्यावा लागला व कर्मचारी संघटनेने आंदोलन करण्याची पुर्णपणे पूर्वतयारी केलेली असून संपूर्ण ऑफशोअर तसेच उरण, हाजीरा, पनवेल, न्हावा व मुंबई येथील सर्व कर्मचारी आपल्या मनातील खदखद आंदोलनाद्वारे मॅनेजमेंटपर्यंत पोहचविण्यास सज्ज झालेले आहेत.

वरील सर्व वृत्तांत मा. श्री. आलोक मिश्रा साहेब यांनी मान्य करुन आता या विषयासंबंधी मॅनेजमेंट गंभीर असून या MOU संदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी 11 जूलै 2017 रोजी तातडीने डेहराडून येथे सभेचे आयोजन केल्याचे सांगितले व तोपर्यंत कर्मचारी संघटनेने आपले आंदोलन स्थगीत करावे अशी विनंती केली. यावर मा. श्री. प्रदीप मयेकर यांनी युनियनची भुमिका स्पष्ट करताना सांगितले कि, गेल्या 3 वर्षात सात मिटींग मध्ये दूर्दैवाने जे घडलेले आहे ते सांगून व 11 तारखेच्या मिटींगमध्ये सुध्दा नेहमीप्रमाणे MOU व्यतिरीक्त मुद्दे

मांडल्यानंतर देखिल आपण थंडपणे त्यास प्रतिक्रिया देत असाल तर 11 तारखेलाच काय पूढिल कोणत्याच मिटींगमध्ये अंतिम निर्णय होवू शकणार नाही. यावर श्री. आलोक मिश्रा साहेबांनी स्पष्टपणे खुलासा केला कि, या 11 तारखेच्या बैठकीत आम्ही सर्व मान्यताप्राप्त युनियन्सना केवळ MOU संदर्भातच चर्चा करण्याचे निर्देश देणार असून मॅनेजमेंट या मिटींगमध्ये सन्माननीय तोडगा सर्वांसमोर ठेवणार आहे व ही मिटींग यशस्वी होईल असा आम्हाला विश्वास आहे.

चिफ ईआर श्री. आलोक मिश्रा यांनी मॅनेजमेंटच्या वतीने कर्मचारी संघटनेला दि. 11 तारखेपर्यंत आंदोलन स्थगीत करण्याची विनंती केली. हि विनंती मान्य करताना मा. श्री. प्रदीप मयेकर यांनी मॅनेजमेंटला स्पष्टपणे कल्पना दिली कि, कर्मचारी संघटनेने MOU संदर्भात जो प्रस्ताव दिलेला आहे, त्याच्या जवळपास असणारा निर्णय जर आपणाकडून आला तरच कर्मचारी संघटना त्याचे स्वागत करील अन्यथा स्थगीत केलेले आंदोलन कर्मचारी संघटना पुन्हा घोषित करील.

सदर बैठकीत कर्मचारी संघटनेने श्री. आलोक मिश्रा यांच्या निदर्शनास आणून दिले कि इंजिनियरींगमध्ये डिप्लोमा केलेल्या कर्मचाऱ्यांचा 'टेक्निशियन' या पदाने उल्लेख करणे अवमानकारक आहे. अन्य कंपन्यांमधील डिप्लोमा केलेल्या कर्मचाऱ्यांची सध्याची पदनामे काय आहेत हे कागदपत्रांसहीत यापूर्वीच आम्ही मॅनजमेंटला दिलेले आहे. याबद्दल सुध्दा कामगारांमध्ये नाराजी आहे. यावर श्री. आलोक मिश्रा यांनी सदर बदलाबाबत पूर्णपणे सहमती दर्शवून पुढिल R&P च्या मिटींगमध्ये मध्ये पदनामांमध्ये बदल करण्याचे आश्वासन दिले आहे.

या बैठकीत Crane Operator च्या अलाउन्सबाबत चर्चा झाली. क्रेन ऑपरेटर्सना महिना रु. 600/- अलाउन्स मिळतो. टेन्यूअर पिरीयडमध्ये जे कर्मचारी क्रेन ऑपरेटर होते ते ओएनजीसीमध्ये नियमित झाल्यावर कर्मचारी संघटनेच्या प्रयत्नाने क्रेन ऑपरेटर म्हणून ऑफशोअरमध्ये वेगवेगळया ठिकाणी रुजू झाले. आता हेडक्वार्टरने अचानक ऑर्डर्स काढून या कर्मचाऱ्यांचे पद **"हेवी मशीन ऑपरटेर"** असल्याने त्यांना सदर अलाउन्स मिळणार नाही व आतापर्यंत मिळालेला अलाउन्सही कापून घेण्यासाठी पत्र संबंधित विभागाला दिले. सदर बाब मागिल आठवड्यात श्री. विजयराज DGM Head Corp. IR यांच्या निदर्शनास आणून ही कारवाई आपण करीत असाल तर ऑफशोअरमध्ये क्रेन ऑपरेटर्सचे काम बंद करण्याचा निर्णय नाईलाजाने घ्यावा लागेल असा इशारा दिला होता. सदर प्रकरणात श्री. आलोक मिश्रा यांनी कर्मचारी संघटनेला पत्र देण्याची विनंती करुन संबंधित सर्वांना '**क्रेन अलाउन्स**' देण्याचे मान्य केले.

कामगारांनी कर्मचारी संघटनेवर दाखविलेला अतुट विश्वास व भक्कम एकजूट यामुळेच कर्मचारी संघटना हे यश संपादन करु शकली. भविष्यात MOU संदर्भातही आपण असेच यशस्वी होवू असे आम्ही सर्व कामगारांना आश्वासीत करीत आहोत.

**कामगार एकता झिंदाबाद ! कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

दि. 30 जून 2017

**प्रकाश दळवी**
अध्यक्ष